# ‘अपूर्वाई’ प्रवासवर्णनातील व्यक्तिचित्रण आणि भाषाशैली

**डॉ. पांडुरंग गावडे**
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला

‘प्रवासवर्णन’ हा साहित्यप्रकार ‘आत्मचरित्राशी’ जवळचा आहे. व्यक्तीने आपल्या भ्रमतीत व्यक्ती आणि प्रदेशाचे वर्णन करताना बहुतांश वेळेला तो आपल्या अनुभवाला प्राधान्य देतो आणि प्रवासवर्णनात आत्मचरित्रासारखा मी सतत प्रवासवर्णनात आढळतो. प्रवासवर्णनात लेखक स्वतःच्या खाजगी गोष्टी आवडीनिवडी सवयी गुण - दोष प्रवासवर्णनातून सहज मांडत नसतो. प्राचीन काळी अनेक परदेशी प्रवासी भारतात येऊन गेले. परंतु भारतीय प्रवासी बाहेर देशात गेले आणि त्यांनी आपले अनुभव, नोंदी ठेवल्यानाही किंबहुना तसे काही उपलब्ध नाही. मराठीतील पहिले प्रवासवर्णन म्हणून जी नोंद सापडते ती नामदेवांच्या तीर्थावळी नामदेव पंजाबच्या प्रांतात गेले आणि त्यांची शिकवण आदर्श मानून शीख धर्माच्या पवित्र ‘गुरुग्रंथसाहेब’ उल्लेख आढळतो. म्हणून मराठीतील ते प्रवासवर्णनाचे पहिले उल्लेख म्हणून उपलब्ध आहेत. गोडसे भटजी यांचे ‘माझा प्रवास’ या प्रवासवर्णनाला १८५७ च्या बंडाची पार्श्वभूमी आहे. या प्रवासवर्णनात रायगड मधील पेण पासून झाशीपर्यंत आणि परत पेण अशा प्रवासवर्णनात त्यांना ज्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागले त्याच बरोबर ज्या व्यक्ती भेटल्या आणि प्रदेशाचे वर्णन यामध्ये गोडसे भटजी केले आहे. त्यानंतर पंडिता रमाबाई यांनी लिहिलेल्या इंग्लंडच्या प्रवासवर्णनाचा उल्लेख करावा लागेल. अनंत काणेकराच्या ‘धुक्यातून लाल ताऱ्याकडे’ प्रभाकर पाध्ये यांचे ‘तोकोनामा’ गंगाधर गाडगीळ यांचे ‘गोपुराच्या प्रदेशात’ अशा महत्त्वाच्या प्रवासवर्णनाचा उल्लेख करावा लागतो.

**‘अपूर्वाई’ प्रवासवर्णन**

पु. ल. देशपांडे यांची प्रवास वर्णने ‘अपूर्वाई’ (१९६०), पूर्वरंग (१९६३), जावे त्यांच्या देशा (१९७४), वंगचित्र (१९७४) या सर्व प्रवासवर्णनात त्याचे पहिले प्रवासवर्णन म्हणून अपूर्वाईचे वेगळेपण अनेक अंगांनी वेगळेपण लक्षात घेता त्यांनी इतर प्रवासवर्णनापेक्षा या मध्ये आपली माहिती आपले व्यक्तिमत्व अधिक व्यक्त केले आहे. त्याचबरोबर त्यांनी इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशातील कला, संस्कृती, समाजजीवन, रितीरिवाज, बोलण्या-चालण्याच्या तऱ्हा अत्यंत बारकाईने टिपल्या आहेत. हे त्यांचे वेगळेपण या प्रवासवर्णनात दिसते. परदेशात जाताना त्यांना विमानतळावर सोडण्यास आलेल्या मित्राबद्दल ते बोलतात, ‘दोस्ती ही माझ्या आयुष्यातील अपूर्व कमाई आहे. दोस्तीच्या हिशेबात मी कदाचित बिर्लापेक्षाही श्रीमंत असेल’. १ मध्यरात्री निरोपास गोंधळून जातात. सुंदर फुलास देऊन मला जो निरोप दिला त्यामुळे मी आतल्या आत गलबललो होतो. (पृष्ठ ३९) २ या वर्णनातून पु. लं. च्या अंतःकरणात मित्राविषयी असलेला कोमलभाव दिसून येतो. प्रवासवर्णनात केवळ स्थलवर्णन अपेक्षित नाही. व्यक्ती ज्यावेळी वेगवेगळ्या स्थळांना भेटी देतात त्यावेळी ती स्थळे तिथल्या मानवी जीवनाचे इतिहास भूगोल दर्शवितात. हे केवळ शक्य नसते. त्यामध्ये मानवी भावभावनाच्या मिश्रणाशिवाय ते व्यक्त असते. परदेश प्रवास हा मराठी माणसाच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. पु. ल. देशपांडे यांनी अपुर्वाई १९६० मध्ये प्रसिद्ध झाले तो काळ त्या काळातील दळणवळण व्यवस्था, वाहतुकीची साधने आणि विमान प्रवास हा सर्वस्वी मराठी समाजाला नविन होता. विमानातून प्रवास करणे हे सहजासहजी आजच्या इतके सहज सोपे नव्हते. म्हणून अपूर्वाईकडे वाचक आश्चर्याने कुतुहलाने पाहतो हे साहजिकच आहे.

‘अपूर्वाई’च्या सुरुवातीस परदेशात जायचे आहे हा विचार आणि त्याची प्रत्यक्ष पुर्वतयारी ती कपडे नविन रंगाढंगाचे आणि त्याचे वेगळेपण आणि ही तयारी करताना मनाच्या होणाऱ्या वेगवेगळ्या सविस्तर मांडल्या आहेत. मध्यमवर्गीय समाजाचे प्रतिबंध या पहिल्या प्रवासवर्णनात आढळते. आजवरचा केवळ आजूबाजूच्या शहरांचा प्रवास जास्तीत जास्त लांबचा प्रवास म्हणजे दिल्ली केलेला अनुभव वेगळा आणि परदेशात जाणे वेगळे आहे. याचे भान क्षणात क्षणात दिसते. परदेशात जाण्यासाठी तिकीट काढण्यापासून येणारे अनुभवचा अनुभव व्यक्त केला. इंग्लंडला जाण्यासाठी अनेक प्रकारची इंजेक्शन घ्यावी लागतात. ही इंजेक्शने टोचून घेण्यासाठी काय उलाढाली कराव्या लागतात आणि ‘मला कुत्र्याचे इंजेक्शन नको आहे, कॉलऱ्याचे हवे आहे’ असे ते प्रत्येकाला सांगू लागतात. या प्रसंगातून लेखकाची

अज्ञान दाखविण्याची इच्छा नसून जे प्रत्यक्ष अनुभव आले ते कोणताही आडपडदा घेता ते जे आहे तसे मांडले आहे. या बरोबरच पासपोर्ट - व्हिसा आणि इतर कार्यालयात आलेले अनुभव ते मांडतात. पु. लं. या प्रवासवर्णनात एक प्रभावी मांडणी आवडले याचे कारण सर्वसामान्य माणसाला जे खरोखर अनुभव येतात ते त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून आले आहे. ही बारीक सारीक निरीक्षणे ते मांडतात. त्यामुळे वाचकाला आपणच हे अनुभवतो आहे असे वाटते. हे वाटणे म्हणजे प्रवासवर्णनाचे महत्त्वाचे यश आहे.

विमानातून जमिनीवरचे कसे दिसते हे त्यांनी सांगितले आहेच. विमानाचा पहिला अनुभव कैरो येथे होता. पुढे विमानातून वाळवंट कसे दिसले. सुवेझ कालवा दिसताच त्यांना महायुद्धांत मानवी जीवन कसे उद्ध्वस्त झाले हे आठवू लागते. जिनीव्हा मध्ये युरोपीयन थंडीचा आलेला अनुभव ‘गारठा म्हातारा असतो ही थंडी नवयौवना होती’ हे वर्णन त्यांनी सहजच केलेले नाही. त्यांना इथल्या समाजजिवनाचे जगणे त्यातून व्यक्त करायचे आहे. लंडनच्या विमानतळावर उतरल्यावर जे त्यांनी मनात साठविलेले आणि प्रत्यक्ष दिसलेले लंडन आपल्या विनोदी वृत्तीने बारीक सारीक घटना प्रसंगाचे वर्णन केले आहे. त्यांना इथल्या नाटकांचा शोध घ्यायचा होता. लंडन मुक्कामात बरीच नाटके पाहिली. नट - दिग्दर्शक, दिग्दर्शक - निर्मात्यात भांडणे झालेली त्यांनी पाहिली नाही. मराठी नाट्य क्षेत्रात, विश्वात त्यान अनुभव आला आणि आपल्याकडे जे मतभेद असतात, भांडणे असतात तसे मतभेद भांडणे त्यांना दिसली नाही. ‘अपूर्वाई’ या प्रवासवर्णनात लेखकांनी या प्रदेशात फिरताना इथली कला, संस्कृती, आचार - विचार, आहार - विहार आणि लोकसंस्कार अशा जीवनाच्या अनेक अंगांनी निरीक्षण केले. प्रत्येक प्रसंगात स्थलवर्णनात त्यांनी आपल्या संस्कृती जगण्याची सवय या सर्वांत त्यांनी आपल्या मनात नकळत तुलना केली आहे. इथे असे आहे आपल्याकडे असे आहे. हे सर्व करताना त्यांचा विनोदी स्वभाव व मन त्यातून दिसते.

**‘अपूर्वाई’ प्रवासवर्णनातील व्यक्तिचित्रण :**

पु. ल. देशपांडे यांच्या ‘अपूर्वाई’ या प्रवासवर्णनात प्रभावी व्यक्तिचित्रण आणि त्या व्यक्तीची संस्कृती आणि व्यक्तींचा प्रामाणिकपणा आणि वक्तशीरपणा त्यांना प्रभावित करतो. इथला शिपाई, कारकुन, अधिकारी आपल्या कार्यालयात वक्तशीरपणा आणि प्रामाणिकपणा दाखवितो. देशाच्या जडणघडीत या व्यक्तीचा महत्त्वाचा असतो. इथल्या शिस्तीचा त्यांना सलाम करावासा वाटतो. लंडनमध्ये प्रोफेसर असो की लिफ्टमन तो सहजतेने, समानतेने वागतात. लिफ्टमनच्या स्वभावाचे वर्णन त्याच्या कामाविषयी, त्याच्या बोलण्याविषयी पु. ल. सविस्तर वर्णन करतात. ब्रिटीशांच्या वृत्तीतील संस्कृतीतील ही स्वातंत्र्य व समानतेबद्दलची ओढ लोकशाहीतून आली आहे. ते म्हणतात, ‘‘मला वाटते लोकशाही देखील रक्तात मुरावी लागते. त्याला काही पिढ्या जाव्या लागतात.’’ - इंग्लंड मधील भारतीच दुतावासाच्या कार्यालयात गेल्यावर तिथल्या कर्मचारी वर्गाचे पु. ल. वर्णन करतात आणि ते म्हणतात, आपण आपले वर्तन जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी बदलत नाही.

पहिल्या प्रकरणातील अतिशहाणा शिंपी टांगा आडवणारा कारकुन दुस-या प्रकरणातील कोचरेकर मास्तरांसारखा धोरणारा सहप्रवासी वर्तमानपत्र विकणारी मुलगी, खाणावळवाला अबोल चर्चिल, हवाई सुंदरी अशी अनेक व्यक्तिरेखा त्याच्या गुणवैशिष्ट्यासह चित्रित केली आहेत. अपूर्वाई मध्ये अनेक माणसांना भेटतात ही त्यांची स्वाभाविक ओढ आहे. म्हणूनच ते म्हणतात मला पहायला आवडतात माणसे. (पृष्ठ क्र. १६३) बोलक्या माणसाशी ते अधिक जवळीक साधतात. आपल्या समवयस्क माणसाशी भेटताना जेवढा आनंद होतो त्यापेक्षा त्याच्या लहान मुलांच्या निरागसतेचा त्याच्या सहज वर्तनाचा त्यांच्या बोलण्याचा आनंद होतो. वेगवेगळ्या देशात मुलांना कशी वागणूक दिली जाते. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा असतो. याविषयी ते आपले निरीक्षण नोंदवतात. ‘अपूर्वाई’ या प्रवासवर्णनाचे व्यक्तिचित्रण इतके सहज घडविले आहे की, त्यामध्ये कोणताही कृत्रिमपणा येत नाही. व्यक्तिचित्रणातील बारकावे आपल्याला लक्षात येतात. वेगवेगळ्या भाषा बोलणा-या व्यक्तिचा स्वभाव ओळखणे पु. लं. ना सहज जमले आहे. त्यामुळे त्यांचे हे प्रवासवर्णन अधिक प्रभावशाली राहिले आहे.

‘अपूर्वाई’ या प्रवासवर्णनाच्या शेवटच्या भागात त्यांनी इंग्लंडमधील काही युवती भारतीयांशी लग्न करुन येतात. त्यावेळी त्यांना प्रश्न पडतो यांचे कसे होणार. भारतीय कुटुंब संस्था आणि संस्कृती याचे वर्णन त्यांनी केले आहे. देश म्हणजे व्यक्ती आणि समाज आणि त्याचे वर्तन असते. व्यक्ती स्वतःसाठी कसा जगतो व देशासाठी कसा जगतो यावर देशमहान बनतो हे त्यांनी निरीक्षण नोंदविले आहे.

**‘अपूर्वाई’ प्रवासवर्णनाची भाषाशैली :**

पु. ल. देशपांडे यांच्या ‘अपूर्वाई’ या प्रवासवर्णनात जशी व्यक्तिचित्रणाची खास वैशिष्ट्ये दिसतात. त्याचप्रमाणे

त्यामध्ये भाषेचे विविध पैलू दिसतात. आपली भाषा वापरत असताना त्या भाषेला अधिक सौंदर्याने खुलविण्याचे कसब त्यांच्या लेखनात आढळते. मुळातच पु. ल. देशपांडे हे विनोदी शैलीकार म्हणून ओळखले जाते. परंतू या प्रवासवर्णनात त्यांनी वापरलेली भाषिक शैली वेगळी आहे. सहज स्वाभाविक आणि तितकाच अस्सल विनोद त्यांनी वापरला आहे. त्यासाठी लागणारी सूक्ष्म निरीक्षण शक्ती माणूसकीची जाणीव प्रसंगी हसविण्याची सहज वृत्ती आणि विसंगती टाळण्याचे कसब या सर्वांमुळे भाषा अधिक सहज वाचनिय आणि आल्हाददायी ठरली आहे. त्यांना संस्कृत हिंदी व इतर भाषांचे असलेले ज्ञान यामुळे त्यांची भाषाशैली सहज ओघवती आहे. परदेशातील व्यक्ती त्यांचा स्वभाव, पेहराव, वर्तन अशा अनेक प्रसंगाचे वर्णन करताना त्याची भाषिक जाण अधिक ठळकपणे जाणवते. माणसाला बोलत करण्याची कसब यामुळे या प्रवास वर्णनातील भाषाशैली अधिक लक्षवेधक ठरली आहे.

**निष्कर्ष :**

१) 'अपूर्वाई' हे प्रवासवर्णन पु. ल. चे आत्मकथन आहे. त्याच्या समयसुचकतेचे दर्शन घडते. त्यातून नाटककार, ललितचित्रण आणि संस्कृतीदर्शन घडविते.

२) मानवी जीवनातील सत्य आणि बारकावे त्यांनी मांडले आहेत.

३)आपल्या समाजजीवनाचे आणि परदेशातील समाजजीवनाचे संस्कृतीचे कलेचे दर्शन घडविले आहे.

४) वक्तशीरपणा आणि प्रामाणिकपणा त्यांना भावला. हे त्यांनी प्रत्येक घटना प्रसंगातून दाखवून दिले.

५) प्रवासवर्णनाची भाषा आणि मानवी वर्तनाचे बारकावे सूक्ष्मपणे टिपले आहे.

६) वाचकाला आपण स्वतः हा प्रवास करत आहोत असे मनोमन वाटावे इतके सहज वर्णन त्यांनी केले आहे.

७) देश पाहणे म्हण्ंजे शहरे, भौतिक सुविधा हे नसून 'माणसे' पाहणे खूप महत्त्वाचे आहे हे त्याच्या 'अपूर्वाई' या प्रवासवर्णनात स्पष्ट जाणवते.

**संदर्भ :**

१) देशपांडे पु. ल. अपूर्वाई - देशमुख आणि कंपनी प्र. आ. १९६०, पृ. ३९.
२) सावंत वसंत प्रवासवर्णन एक वाडमय प्रकार,महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई प्रथम आवृत्ती १९८७
३) देशपांडे पु. ल.पूर्वरंग देशमुख आणि कंपनी प्र. आ. १९६३
४) जोग रा.श्री मराठी वाडमयाचा इतिहास खंड ४ था